# वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

**१. पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या लिंकवर फॉर्म भरावा?**

**उत्तर-** बार्टी लिंक:- https://barticet.in

टीआरटीआय लिंक:- https://barticet.in/TRTI

सारथी लिंक:- https://barticet.in/SARTHI

महाज्योती लिंक:- https://barticet.in/MAHAJYOTI

आर्टी लिंक:- https://barticet.in/ARTI

**२. बार्टी/ टीआरटीआय/ सारथी/ महाज्योती/ आर्टी यासंस्थेतंर्गत कोणत्या जातींचा समावेश होतो?**

**उत्तर-**

| संस्थेचे नाव | समाविष्ट जाती |
|---|---|
| डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे | अनुसूचित जातीतील (मांग, मातंग, मिनीमादिग, दखनी-मांग, राधे-मांग, मादगी, मादिगा, मांग-म्हशी, मांग-गारोडी, गारुडी, मांग-गारुडी, मदारी) या वगळता इतर सर्व जाती |
| छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे | मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा |
| आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे | सर्व अनुसूचति जमाती |
| महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर | इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) तसेच विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी.) या जाती |
| अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई | ३५.मादगी<br>३६. मादिगा<br>४७.मांग, मातंग, मिनीमादिग, दखनी-मांग, राधे-मांग, , मांग-म्हशी, गारुडी, मदारी<br>४८. मांग-गारोडी, मांग-गारुडी |

**३. बार्टी संस्थेमार्फतच जाहिरात प्रसिद्ध का करण्यात आली आहे?**

**उत्तर -** बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण योजना कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वंकष धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार यावर्षी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या सामायिक चाळणी परिक्षा घेण्याची जबाबदारी बार्टी संस्थेवर असल्याकारणाने बार्टी संस्थेमार्फतच जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**४. बार्टी/ टीआरटीआय/ सारथी/ महाज्योती/ आर्टी यासंस्थेतंर्गत कोणत्या जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.**

**उत्तर** — या संस्थांतर्गत समाविष्ट अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम :-

१.यु.पी.एस.सी. - नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण (दिल्ली)
२. यु.पी.एस.सी. - नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण (महाराष्ट्र)
३. एम.पी.एस.सी राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
४. एम.पी.एस.सी. - अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण
५. न्यायिक सेवा (JMFC) प्रशिक्षण कार्यक्रम
६. एम.पी.एस.सी. - महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण
७. बँक (IBPS), रेल्वे, एलआयसी इत्यादी तत्सम स्पर्धा परीक्षा (अनिवासी)
८. पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण
९. कर्मचारी निवड आयोग (SSC) वर्ग-३ परीक्षा पूर्व प्रशिक्षण

**५. बार्टी/ टीआरटीआय/ सारथी/ महाज्योती/ आर्टी या संस्थेंची विविध योजनांसाठी किमान पात्रता काय आहे?**

**उत्तर** —

| योजनेचे नाव | किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| युपीएससी नागरी सेवा (दिल्ली व महाराष्ट्र) | किमान पदवी उत्तीर्ण |
| एमपीएससी (राज्यसेवा / गट ब व गट क) | किमान पदवी उत्तीर्ण |
| दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) | विधी शाखेची पदवी उत्तीर्ण |
| महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) | इंजिनिअरींग पदवी उत्तीर्ण |
| बँक(IBPS)/ रेल्वे/ एलआयसी इ. तत्सम स्पर्धा | किमान पदवी उत्तीर्ण |
| पोलिस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण | १०+२ उत्तीर्ण |
| कर्मचारी निवड आयोग (SSC-CGL) | किमान पदवी उत्तीर्ण |

**६. बार्टी/ टीआरटीआय/ सारथी/ महाज्योती/ आर्टी या संस्थेंच्या विविध योजनांच्या लाभासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे कोणती?**

**उत्तर** — १. जात/जमातीचे मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
२. जमातीचे वैधता मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
३. दहावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
४. बारावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
५. पदवी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत
६. रहिवासी दाखला मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

७. आधारकार्ड मूळ छायांकित स्कॅन प्रत
८. आधारकार्ड लिंक असलेले मूळ बँक तपशील – पास बुक स्कॅन प्रत
९. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मूळ उत्पन्नाचा दाखला स्कॅन प्रत
१०. दिव्यांग असल्यास, सिविल सर्जन यांनी निर्गमित केलेला दिव्यांगत्वाचा दाखला स्कॅन प्रत
११. अनाथ असल्यास, उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा
दाखला स्कॅन प्रत.
१२. नॉन क्रीमिलेयर दाखला मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत (सारथी व महाज्योती करिता)

**७. मातंग व तत्सम जातींच्या विद्यार्थ्यांनी बार्टीच्या लिंकवर अर्ज करण्याची आवश्यकता आहे का?**

**उत्तर** – नाही. मातंग व त्यातील तत्सम जातींमधील विद्यार्थ्यांसाठी आर्टी ही संस्था कार्यरत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी https://barticet.in/ARTI या संकेतस्थळावर अर्ज करावा.

**८. आर्टी व बार्टी या दोन्ही संस्थांकडे मातंग व तत्सम जातींच्या विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल का?**

**उत्तर** – नाही. मातंग व त्यातील तत्सम जातींकरिता (मांग, मातंग, मिनीमादिग, दखनी-मांग, राधे-मांग, मादगी, मादिगा, मांग-म्हशी, मांग-गारोडी, गारुडी, मांग-गारुडी, मदारी) या समाजासाठी आर्टी ही संस्था कार्यरत आहे. त्यामुळे मातंग व तत्सम जातींतील विद्यार्थ्यांनी आर्टी या संस्थेकडे अर्ज करावा.

**९. बार्टी संस्थेसाठी नोंदणी (Registration) केल्यावर आर्टी संस्थेसाठी नोंदणी (Registration) करता येते का?**

**उत्तर** – नाही. सर्व संस्थांसाठी परिक्षा पोर्टल हे एकच असल्याने ‘Already exit’ हा मेसेज येईल. त्यामुळे स्वतंत्र नोंदणी (Registration) करण्याची आवश्यकता नाही.

**१०.बार्टी अंतर्गत कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना बार्टी/आर्टी अंतर्गत त्याच योजनेचा दुबार लाभ घेता येईल का?**

**उत्तर** – नाही. परंतू वरिष्ठ पातळीनूसार परिक्षांकरिता बार्टी व आर्टीचे विद्यार्थी अर्ज करू शकतात. शैक्षणिक पात्रता, अभ्यासक्रमांची व्याप्ती, निवड प्रक्रिया, या बाबींचा विचार करून खालीलक्रमानूसार योजनेचा लाभ घेऊ शकतात.

१. पोलीस व मिलिटरी भरती,
२. बँक (IBPS), रेल्वे, एल. आय. सी. व इतर तत्सम स्पर्धा परिक्षा,
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट व व गट "क",
४. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES),
५. महाराष्ट्र न्यायिक सेवा,
६. महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्य सेवा
७. UPSC नागरी सेवा परीक्षा

**टिप :-** न्यायिक परिक्षा व अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेली पात्रता, शैक्षणिक अर्हता तसेच अभ्यासक्रम भिन्न असल्याने, असे विशेष अर्हता प्राप्त विद्यार्थी हे न्यायिक परिक्षा व अभियांत्रिकी सेवा या परीक्षांव्यतिरिक्त इतर विशेष अर्हता लागू नसलेल्या परीक्षासाठींच्या पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेशास पात्र ठरतील.

**११. पदवीच्या द्वितीय, तृतीय वर्षाला असणारे विद्यार्थी युपीएससी व एमपीएससी या योजनेसाठी अर्ज करू शकतात का?**

**उत्तर** — नाही. युपीएससी व एमपीएससी या योजनेसाठी किमान शैक्षणिक पात्रता ही पदवी उत्तीर्ण ही आहे.